RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ३१ ] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट ५ - ११, २०२१ / श्रावण १४ - २०, शके १९४३ [ पृष्ठे २४

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक ५ जुलै २०२१

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६***

**अधिसूचना**

क्रमांक टीपीएस-१११९/११६३/प्र. क्र. १२७/२०१९/नवि-९.— ज्याअर्थी, इगतपुरी शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ *(१)* अन्वये शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-११०८/२९५१/प्र.क्र.८१/०९/नवि-९, दिनांक २१ ऑक्टोबर २०११ अन्वये (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) मंजूर असून दिनांक १ डिसेंबर २०११ पासून अंमलात आली आहे व वगळलेल्या भागासाठी उक्त विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक टीपीएस-१११२/१७५ (न)/प्र.क्र.३१/२०१३/नवि-९, दिनांक २१ जानेवारी २०१५ अन्वये मंजूर असून दिनांक ३ जुलै २०१५ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेसाठी इगतपुरी नगरपरिषद नियोजन प्राधिकरण आहे (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौजे तळेगाव येथील गट नंबर १८१/२ पै. (क्षेत्र २२९८० चौ. मी.) व १८१/३ (क्षेत्र ११२४० चौ. मी.) या जागा (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे) शेती या वापर विभागात समाविष्ट (यापुढे "उक्त भूवापर विभाग" असे संबोधले आहे) आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ८४१, दिनांक ३१ मे २०१७ अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करून उक्त जागा उक्त भूवापर विभागातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत प्रस्तावित करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१)* अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव दिनांक ४ एप्रिल २०१८ च्या पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केलेला आहे (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त फेरबदलाचा प्रस्ताव काही अटींसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालकांनी शासनाच्या धोरणानुसार सन २०२१-२२ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यानुसार उक्त जागेच्या जमीनमूल्याच्या ५ टक्के दराने येणाऱ्या अधिमूल्य रकमेपैकी ५० टक्के शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रुपये २,६८,३१९ सहायक संचालक नगररचना, नाशिक शाखा, नाशिक यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक १४ जून २०२१ रोजी जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५० टक्के अधिमूल्याची रक्कम रुपये २,६८,३१९ इगतपुरी नगरपरिषद या कार्यालयास दिनांक १६ जून २०२१ रोजी जमा केलेली आहे.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम *(२)* अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील, प्रस्तावित फेरबदलास शासन खालीलप्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दिनांक २१ ऑक्टोबर २०११ ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक २१ ऑक्टोबर २०११ रोजीच्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

मौजे तळेगाव येथील गट नंबर १८१/२ पै. (क्षेत्र २२९८० चौ. मी.) व १८१/३ (क्षेत्र ११२४० चौ. मी.) या जागा खालील अटींवर शेती वापर विभागातून वगळून निवासी वापर विभागात नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहेत.

**अट क्रमांक १** कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, नाशिक यांचे दिनांक ८ फेब्रुवारी २०१९ व दिनांक २७ ऑगस्ट २०१९ रोजीचे पत्रातील अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

**अट क्रमांक २** १० टक्के खुल्या जागेव्यतिरिक्त १० टक्के सुविधा क्षेत्र रेखांकन नकाशामध्ये प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

सदरची अधिसूचना जनतेच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी, इगतपुरी नगरपरिषद, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांचे कार्यालयात, एका महिन्याच्या कालावधीसाठी, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

**प्रणव कर्पे,**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

---

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai - 400 032

Dated 5th July 2021

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**Notification**

No. TPS-1119/1163/CR-127/2019/UD-09.– Whereas, the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1108/2951/CR-81/09/UD-9, dated 21st October 2011 has partly sanctioned the Development Plan for Additional Area of Igatpuri City (hereinafter referred to as “the said Development Plan”) under Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and the same has come into force with effect from 1st December 2011 and Excluded Part of the said Development Plan has been sanctioned under Section 31 *(1)* of the said Act *vide* Notification No. TPS-1112/175/(N)/CR-31/2013/UD-09, dated 21st January 2015 and the same has come into force with effect from 3rd July 2015 ;

and whereas, the Igatpuri Municipal Council is the Planning Authority for the said Development Plan (hereinafter referred to as “the said Planning Authority”) ;

and whereas, in the said Development Plan land bearing Gat No. 181/2 (Pt.) (Area 22980 sq mt.) and Gat No. 181/3 (Area 11240 sq.mt.) of Mouje Talegaon (hereinafter referred to as "the said land") are included in "Agriculture Zone" (hereinafter referred to as "the said zone") ;

and whereas, the said Planning Authority *vide* it's General Body Resolution No. 841, dated 31st May 2017 resolved to modify the said Development Plan by deleting the said land from the said zone and to be included in Residential Zone (hereinafter referred to as "the said Modification Proposal") by carrying out a modification to the said Development Plan by following all the legal formalities stipulated under the said Act, forwarded the proposal to Government for sanction *vide* letter dated 4th April 2018 ;

and whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the Government is of the opinion that the proposed Modification should be sanctioned subject to certain conditions ;

and whereas, the Land Ownrs of the said land as per the Government Policy have deposited Rs. 2,68,319 towards the 50 per cent Government share of premium amount as per the 5 per cent rate of the said lands as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2021-22 in the Government Treasury on 14th June 2021 through the Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik and remaining 50 per cent of the premium amount Rs. 2,68,319 payable to the Planning Authority has been deposited with the Igatpuri Municipal Council on 16th June 2021 ;

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section *(2)* of Section 37 of the said Act, the Government hereby sanctions the proposed modification subject to certain conditions and for that purpose amends the aforesaid Notification dated 21st October 2011.

In the Schedule of Modifications appended to the aforesaid Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry -

**ENTRY**

Land bearing Gat No. 181/2 (Pt.) (Area 22980 sq. mt.) and Gat No. 181/3 (Area 11240 sq. mt.) of Mouje Talegaon are deleted from "Agriculture Zone", subject to Conditions mentioned below and included in Residential Zone, as shown on Plan.

**Condition No. 1** The conditions mentioned in the letter dated 8th February 2019 and dated 27th August 2019 of Executive Engineer, Maharashtra Jeevan Pradhikaran shall be complied.

**Condition No. 2** In addition to mandatory 10 per cent open space an additional 10 per cent Amenity Space is required to be proposed in the layout Plan.

This Notification shall be kept open for inspection by the general public during office hours, for the period of one month in the office of the Chief Officer, Igatpuri Municipal Council, Igatpuri, district Nashik.

This Notification shall also be published on the Government web-site www.maharashtra.gov.in

*By order and in the name of the Governor of Maharashtra,*

**PRANAV KARPE,**

Section Officer to Government.

# संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

## जिल्हाधिकारी यांजकडून

### अधिसूचना

**जिल्हा अहमदनगर**

क्रमांक मह/आस्था/कार्या.५-अ-२/५५७/२०२१.— महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१७/ प्र.क्र. ४१५/कार्यासन १२, दिनांक ९ एप्रिल २०१८ नुसार समुपदेशनाद्वारे बदलीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील टप्पा क्रमांक १ येथील टीपमध्ये अवघड क्षेत्राचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक मशा/कार्या-१/आस्था-४/२०६/२०१८, दिनांक २४ एप्रिल २०१८ अन्वये जिल्ह्यातील दळणवळणाच्या दृष्टिकोनातून दुर्गम व डोंगराळ भाग जिल्हास्तरावर निश्चित करणेकरिता मा. विभागीय आयुक्त यांचेवतीने प्राधिकृत केले आहे. त्यानुसार समुपदेशनाद्वारे बदलीबाबतच्या धोरणाची अंमलबजावणी करणेकरिता अहमदनगर जिल्ह्यातील अवघड क्षेत्र घोषित करणेकामी क्रमांक मह/आस्था/ कार्या. ५-अ-२/४६२/२०२१, दिनांक १५ जून २०२१ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप अधिसूचनेबाबत आवश्यक असलेप्रमाणे पूर्व प्रसिद्धीनंतर विहित मुदतीत हरकती व सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.

यास्तव, क्रमांक मह/आस्था/कार्या. ५-अ-२/५५६/२०२१, दिनांक १२ जुलै २०२१ नुसार समुपदेशनाद्वारे बदलीबाबतच्या धोरणाच्या अंमलबजावणीकरिता मी, डॉ. राजेंद्र ब. भोसले, जिल्हाधिकारी, अहमदनगर याद्वारे खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र दळणवळणाच्या दृष्टिकोनातून दुर्गम व डोंगराळ भाग म्हणून अवघड क्षेत्र घोषित करीत आहे.

### अनुसूची

**जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले**

| अ. क्र. | महसूल मंडळाचे नाव | मंडळात समाविष्ट असलेल्या सझाचे नाव | समुपदेशनाद्वारे बदली करण्यासाठीचे अवघड क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दळणवळणाच्या दृष्टीने दुर्गम गाव | आदिवासी/ अनुसूचित क्षेत्र | डोंगराळ भाग (गाव) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अकोले | अकोले | -- | -- | अकोले<br>नवलेवाडी<br>अगस्तीनगर |
| २ | | रुंभोडी | -- | -- | रुंभोडी<br>इंदुरी<br>उंचखडक बु.<br>औरंगपूर |
| ३ | | धामनगाव आवारी | -- | -- | धामनगाव आवारी<br>धुमाळवाडी<br>आंबड |
| ४ | | सुगाव बु. | -- | -- | सुगाव बु.<br>परखतपूर<br>वाशेरे<br>मनोहरपूर |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अकोले —*चालू* | कळस बु. | -- | -- | कळस बु.<br>कळस खु.<br>सुलतानपूर |
| ६ | | म्हाळादेवी | -- | -- | म्हाळादेवी<br>निंब्रळ<br>निळवंडे |
| ७ | समशेरपूर | समशेरपूर | -- | समशेरपूर<br>मुथाळणे | -- |
| ८ | | घोडसरवाडी | -- | सावरगाव पाट<br>टाहाकारी | घोडसरवाडी<br>नागवाडी |
| ९ | | केळी रुम्हणवाडी | -- | केळी रुम्हणवाडी<br>कोंभाळणे<br>सांगवी | पोपरेवाडी<br>दगडवाडी |
| १० | | पाडोशी | -- | पाडोशी | कोकणवाडी<br>पिंपळदरावाडी<br>चंदगीरवाडी |
| ११ | | तिरढे | -- | तिरढे<br>म्हाळुंगी | शिवाजीनगर<br>पाचपट्टावाडी<br>पेढेवाडी |
| १२ | | खिरविरे | -- | खिरविरे<br>एकदरे<br>बिताका | जायनावाडी |
| १३ | | देवठाण | -- | -- | देवठाण |
| १४ | साकीरवाडी | साकीरवाडी | -- | साकीरवाडी<br>गोंदोशी<br>माणिक ओझर<br>सावरकुटे | कौठवाडी |
| १५ | | मवेशी | -- | मवेशी<br>वांजुळशेत<br>पुरुषवाडी<br>खडकी खु.<br>बलठण<br>धामणवन | खडकी बु.<br>बारववाडी |
| १६ | | आंबित | -- | आंबित<br>कुमशेत<br>शिरपुंजे बु.<br>शिरपुंजे खु.<br>शिसवद | -- |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १७ | साकीरवाडी —*चालू* | लव्हाळी ओतुर | -- | लव्हाळी ओतुर<br>पिंपरी<br>वाघदरी<br>लव्हाळी कोतुळ<br>पाचनई<br>कोथळे | -- |
| १८ | | पाडाळणे | -- | पाडाळणे<br>शेलद<br>चिंचावणे | |
| १९ | वीरगाव | वीरगाव | -- | -- | वीरगाव |
| २० | | हिवरगाव | -- | -- | हिवरगाव<br>डोंगरगाव |
| २१ | | गणोरे | -- | -- | गणोरे<br>पिंपळगाव<br>निपाणी |
| २२ | | टाकळी | -- | -- | टाकळी<br>गर्दणी<br>ढोकरी<br>अंबिकानगर<br>आगर<br>खानापूर |
| २३ | | सुगाव खु. | -- | -- | सुगाव खु.<br>कुंभेफळ<br>तांभोळ<br>रेडे |
| २४ | | मेहेंदुरी | -- | -- | मेहेंदुरी<br>बहिरवाडी<br>उंचखडक खु. |
| २५ | शेंडी | शेंडी | -- | शेंडी<br>पेंडशेत<br>मुरशेत<br>बारी<br>चिचोंडी | जहागीरदारवाडी |
| २६ | | वाकी | -- | वाकी<br>आंबेवंगण<br>कोदणी<br>रणद बुद्रुक | -- |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २७ | शेंडी —*चालू* | वारंघुशी | -- | वारंघुशी<br>मान्हेरे | -- |
| २८ | | घाटघर | -- | घाटघर<br>उडदावणे<br>पांजरे<br>साम्रद<br>शिंगणवाडी | -- |
| २९ | | भंडारदरा | -- | भंडारदरा<br>मुतखेल<br>कोलटेंभे<br>रतनवाडी<br>गुहीरे | -- |
| ३० | कोतूळ | कोतूळ | -- | -- | कोतूळ |
| ३१ | | आंभोळ | -- | पैठण<br>शिळवंडी | आंभोळ<br>महादेववाडी |
| ३२ | | कोहणे | -- | कोहणे<br>विहीर<br>शिंदे<br>घोटी<br>तळे<br>सोमलवाडी | -- |
| ३३ | | सातेवाडी | -- | सातेवाडी<br>खेतेवाडी<br>येसरठाव | मोरवाडी<br>उंबरेवाडी |
| ३४ | | पळसुंदे | -- | पळसुंदे<br>अबितखिंड<br>फोफसंडी | -- |
| ३५ | | धामणगाव पाट | -- | -- | धामणगाव पाट<br>मोग्रस<br>पांगरी |
| ३६ | | लिंगदेव | -- | -- | लिंगदेव<br>लहीत बु.<br>पिंपळगाव खांड<br>ठाकरवाडी<br>शिदवड<br>शेरेवाडी<br>ढगेवाडी |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | राजूर | राजूर | -- | राजूर<br>केळुंगण<br>कोहंडी | -- |
| ३८ | | पिंपळगाव नाकविंदा | -- | बाभुळवंडी<br>दिगंबर | पिंपळगाव नाकविंदा<br>शेरणखेल |
| ३९ | | पिंपरकणे | -- | पिंपरकणे<br>शेलविहिरे<br>टिटवी | डोंगरवाडी |
| ४० | | शेणित बु. | -- | शेणित खु.<br>देवगाव<br>लाडगाव<br>पाभुळवंडी | शेणित खु. |
| ४१ | | विठे | -- | विठे<br>जामगाव | भोजदरावाडी<br>निरगुडवाडी<br>चितळवेढे |
| ४२ | | कातळपूर | -- | कातळपूर<br>रणद खु.<br>माळेगाव<br>तेरुंगण | सरोवरवाडी |
| ४३ | ब्राम्हणवाडा | ब्राम्हणवाडा | -- | -- | ब्राम्हणवाडा<br>काळेवाडी<br>खुंटेवाडी<br>जांभळे |
| ४४ | | बेलापूर | -- | -- | बेलापूर<br>बदगी<br>चैतन्यपूर<br>जाचकवाडी |
| ४५ | | मन्याळे | -- | पिसेवाडी<br>करंडी | मन्याळे<br>कळंब |
| ४६ | | चास | -- | -- | चास<br>पिंपळदरी<br>लहित खुर्द<br>चाँदसुरज |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ४७ | ब्राम्हणवाडा —*चालू* | भोळेवाडी | -- | -- | भोळेवाडी<br>वाघापूर<br>बोरी<br>नाचणठाव |
| ४८ | | केळी कोतुळ | -- | केळी कोतुळ<br>केळी ओतुर | गोडेवाडी<br>गारवाडी |

**जिल्हा अहमदनगर, तालुका संगमनेर**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | संगमनेर बु. | संगमनेर बु. | -- | -- | संगमनेर बु.<br>गुंजाळवाडी<br>ढोलेवाडी |
| २ | | सायखिंडी | -- | -- | सायखिंडी<br>चिकणी |
| ३ | | घुलेवाडी | -- | -- | घुलेवाडी<br>वेल्हाळे |
| ४ | | चिखली | -- | -- | चिखली<br>मंगळापूर<br>कासारादुमाला |
| ५ | | जवळेकडलग | -- | -- | जवळेकडलग |
| ६ | | राजापूर | -- | -- | राजापूर<br>निमगाव<br>भोजापूर |
| ७ | धांदरफळ बु. | धांदरफळ बु. | -- | -- | धांदरफळ बु. |
| ८ | | धांदरफळ खु. | -- | -- | धांदरफळ खु.<br>गोडसेवाडी<br>निमज |
| ९ | | निमगाव बु. | -- | -- | निमगाव बु.<br>निमगाव खु.<br>सावरचोळ<br>मेंगाळवाडी |
| १० | | सांगवी | -- | -- | सांगवी<br>कौठे धांदरफळ<br>मिर्झापूर<br>नांदुरी दुमाला |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका संगमनेर** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ११ | धांदरफळ बु. —*चालू* | पेमगिरी | -- | -- | पेमगिरी<br>शिरसगाव<br>धूपे |
| १२ | | पिंपळगाव कौझिरा | -- | -- | पिंपळगाव<br>कौझिरा<br>कोकणेवाडी<br>वडगाव लांडगा |
| १३ | आश्वी बु. | आश्वी बु. | -- | -- | आश्वी बु.<br>प्रतापपूर |
| १४ | | निमगाव जाळी | -- | -- | निमगाव जाळी<br>औरंगपूर |
| १५ | | उंबरी | -- | -- | उंबरी<br>बाळापूर |
| १६ | | रहिमपूर | -- | -- | रहिमपूर<br>मनोली<br>ओझर खु. |
| १७ | | चिंचपूर बु. | -- | -- | चिंचपूर बु.<br>चिंचपूर खु.<br>सादतपूर |
| १८ | शिबलापूर | शिबलापूर | -- | -- | शिबलापूर<br>पानोडी |
| १९ | | खळी | -- | -- | खळी<br>पिंप्रीलौकी<br>अजमपूर |
| २० | | चणेगाव | -- | -- | चणेगाव<br>दाढ खु.<br>झरेकाठी |
| २१ | | आश्वी खु. | -- | -- | आश्वी खु. |
| २२ | | शेडगाव | -- | -- | शेडगाव<br>हंगेवाडी<br>ओझर बु. |
| २३ | | कनोली | -- | -- | कनोली<br>कनकापूर |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका संगमनेर** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २४ | तळेगाव | तळेगाव | -- | -- | तळेगाव<br>आरामपूर<br>आजामपूर<br>जुनेगाव<br>हसनाबाद |
| २५ | | चिंचोली गुरव | -- | -- | चिंचोली गुरव<br>देवकौठे |
| २६ | | पारेगाव बु. | -- | -- | पारेगाव बु.<br>पिंपळे |
| २७ | | नान्नजदुमाला | -- | -- | नान्नजदुमाला<br>काकडवाडी<br>पारेगाव खु. |
| २८ | | वडझरी बु. | -- | -- | वडझरी बु.<br>वडझरी खु. |
| २९ | | लोहारे | -- | -- | लोहारे<br>कासारे<br>मिरपूर |
| ३० | | निमोण | -- | -- | निमोण<br>पळसखेडे<br>सोनेवाडी<br>कऱ्हे |
| ३१ | समनापूर | समनापूर | -- | -- | समनापूर<br>पोखरी हवेली<br>कुरण |
| ३२ | | वडगावपान | -- | -- | वडगावपान<br>माळेगाव हवेली |
| ३३ | | निळवंडे | -- | -- | निळवंडे<br>करूले<br>तिगाव |
| ३४ | | मालदाड | -- | -- | मालदाड<br>सोनोशी |
| ३५ | | मेंढवण | -- | -- | मेंढवण<br>कौठे कमळेश्वर |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका संगमनेर** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | समनापूर —*चालू* | सुकेवाडी | -- | -- | सुकेवाडी<br>खांजापूर |
| ३७ | | कोकणगाव | -- | -- | कोकणगाव<br>शिवापूर<br>कोंची<br>मांची |
| ३८ | घारगाव | घारगाव | -- | -- | घारगाव<br>कुरकुंडी<br>बोरबनवाडी |
| ३९ | | आंबी खालसा | -- | -- | आंबी खालसा<br>माळेगाव पठार<br>कौठे खुर्द<br>खांडगेदरा |
| ४० | | बोटा | -- | -- | बोटा<br>माळवाडी<br>केळेवाडी |
| ४१ | | आंबी दुमाला | -- | -- | आंबी दुमाला<br>म्हसवंडी<br>कुरकुटवाडी |
| ४२ | | कौठे बु. | -- | -- | कौठे बु.<br>वनकुटे<br>भोजंदरी<br>पेमरेवाडी |
| ४३ | | अकलापूर | -- | -- | अकलापूर<br>शेळकेवाडी<br>आभाळवाडी<br>येलखोपवाडी |
| ४४ | डोळसणे | डोळसणे | -- | -- | डोळसणे<br>बांबळेवाडी<br>कर्जुलेपठार<br>गुंजाळवाडी<br>पठार |
| ४५ | | नांदुरखंदरमाळ | -- | -- | नांदुरखंदरमाळ<br>खंदरमाळवाडी |

**अनुसूची** — *चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका संगमनेर** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | डोळसणे — *चालू* | वरुडी पठार | -- | -- | वरुडी पठार<br>सारोळेपठार<br>पोखरी बाळेश्वर<br>सावरगाव घुले |
| ४७ | | जवळेबाळेश्वर | -- | -- | जवळेबाळेश्वर<br>महालवाडी<br>कौठेवाडी<br>पिंपळगाव<br>माथा |
| ४८ | | चंदनापुरी | -- | -- | चंदनापुरी<br>गाभणवाडी<br>सावरगावतळ |
| ४९ | | हिवरगावपावसा | -- | -- | हिवरगावपावसा<br>रायतेवाडी<br>झोळे |
| ५० | साकुर | साकुर | -- | -- | साकुर |
| ५१ | | मांडवे बु. | -- | -- | मांडवे बु.<br>बिरेवाडी<br>शिंदोडी |
| ५२ | | दरेवाडी | -- | -- | दरेवाडी<br>रणखांबवाडी<br>कौठेमलकापूर |
| ५३ | | हिवरगावपठार | -- | -- | हिवरगावपठार<br>शेंडेवाडी<br>जांबुत बु.<br>जांबुत खु. |
| ५४ | | वरवंडी | -- | -- | वरवंडी<br>चौधरवाडी<br>कुंभारवाडी<br>खांबे<br>खरशिंदे<br>कणसेवाडी |
| ५५ | | पिंपळगाव देपा | -- | -- | पिंपळगाव देपा<br>मोधाळवाडी<br>खंडेरायवाडी |

**अनुसूची** — *चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका संगमनेर** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ५६ | पिंपरणे | पिंपरणे | -- | -- | पिंपरणे<br>कोळेवाडे<br>जाखुरी |
| ५७ | | वाघापूर | -- | -- | वाघापूर<br>रायते<br>खराडी |
| ५८ | | जोर्वे | -- | -- | जोर्वे<br>कोल्हेवाडी<br>निंबाळे |
| ५९ | | आंभोरे | -- | -- | आंभोरे<br>मालुंजे<br>डिग्रस |
| ६० | | देवगाव | -- | -- | देवगाव<br>निमगाव टेंभी<br>शिरापूर |
| ६१ | | संगमनेर खु. | -- | -- | संगमनेर खु.<br>वैदुवाडी<br>खांडगाव |

**जिल्हा अहमदनगर, तालुका नगर**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | कापूरवाडी | पोखर्डी | -- | -- | पिं. उज्जैनी |
| २ | | देवगाव | -- | -- | देवगाव<br>आगडगाव<br>रतडगाव |
| ३ | भिंगार | मेहेकरी | -- | -- | मेहेकरी<br>बारदरी |
| ४ | | कौडगाव | -- | -- | कौडगाव<br>बाळेवाडी |
| ५ | | खांडके | -- | -- | खांडके<br>रांजणी<br>माथणी |
| ६ | चास | चास | -- | -- | सोनेवाडी<br>भोयरे पठार<br>भोयरे खुर्द |

**अनुसूची** —*चालू*

**जिल्हा अहमदनगर, तालुका नगर** — *चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ७ | चास —*चालू* | कामरगाव | -- | -- | पिं. गाव कवडा |
| ८ | | निमगाव वाघा | -- | -- | पिं. गाव वाघा |
| ९ | जेऊर | मजले चिंचोली | मजले चिंचोली | -- | उदरमल |
| १० | वाळकी | गुंडेगाव | गुंडेगाव | -- | -- |

**जिल्हा अहमदनगर, तालुका पाथर्डी**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | टाकळी मानूर | चिंचपूर पांगुळ | -- | -- | चिंचपूर पांगुळ<br>ढाकणवाडी |
| २ | माणिकदौंडी | माणिकदौंडी | -- | -- | माणिकदौंडी<br>पिरेवाडी<br>बोरसेवाडी<br>चेकेवाडी |
| ३ | | आल्हनवाडी | -- | -- | आल्हनवाडी |
| ४ | | करोडी | -- | -- | करोडी |
| ५ | | कारेगाव | -- | -- | मोहोरी |

**जिल्हा अहमदनगर, तालुका पारनेर**

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १ | पारनेर | किन्ही | -- | -- | तिखोल |
| २ | | चिंचोली | -- | -- | चिंचोली |
| ३ | वडझिरे | वडझिरे | -- | -- | शेरीकोलदरा |
| ४ | | पाडळी दर्या | -- | -- | पाडळी दर्या<br>जाधववाडी |
| ५ | | लोणीमावळा | -- | -- | दरोडी |
| ६ | टाकळी ढोकेश्वर | सावरगाव | -- | -- | सावरगाव<br>नांदुरपठार |
| ७ | | पिंपळगाव रोठा | -- | -- | कारेगाव |
| ८ | सुपा | हंगा | -- | -- | शहांजापूर |

उपरोक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसूल मंडळापैकी अकोले, संगमनेर तालुक्यातील सर्व महसूल मंडळे तसेच पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी आणि पारनेर तालुक्यातील वडझिरे ही महसूल मंडळे अवघड क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले सर्व सझे अवघड क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**डॉ. राजेन्द्र ब. भोसले,**
(भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, अहमदनगर.

अहमदनगर, १२ जुलै २०२१.

## जिल्हाधिकारी यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ *(१)* व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ *(४)* नुसार**

**अधिसूचना**

**जिल्हा नाशिक**

क्रमांक भूसं/कक्ष-१०/३/कावि-५५६/२०२१.– ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक ----- लागू नाही. प्रकरणास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना क्रमांक टीपीएस-११९१/२१२४/सीआर-१२६/९५/युडी-९, दिनांक १९ फेब्रुवारी १९९६ रोजी काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची '' एक '' मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची '' दोन '' मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, (कोणताही असल्यास) विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ *(४)* नुसार उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची '' तीन '' मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी '' पुनर्वसाहत क्षेत्र '' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची '' चार '' मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**जिल्हा नाशिक, तालुका नाशिक, मौजे नाशिक**

**प्रकरण क्रमांक १९/२०**

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ. मी. |
| ८७६/४ पै. | .. | १६५ |
| ८७६/५ संपूर्ण | .. | ४०० |
| | **एकूण क्षेत्र ..** | **५६५** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : ३० मीटर डी. पी. रोडसाठी.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : ३० मीटर डी. पी. रोडसाठी.

**समाजाला होणारे लाभ** : दळणवळणाची सुविधा निर्माण होईल.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन** : लागू नाही.

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश :** लागू नाही.

**टीप**.- उक्त जमिनींचे नकाशे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांच्या कार्यालयात निरीक्षण करता येऊ येईल.

**सूरज मांढरे,**
जिल्हाधिकारी, नाशिक.

नाशिक, २८ जुलै २०२१.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये घोषणा.**

**जिल्हा धुळे**

क्रमांक एसआर-४/मौजे कावठी/२०२०.– ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, क्रमांक १, धुळे यांनी खालील परिशिष्ट - १ मध्ये नमूद केलेल्या जमिनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ९ जुलै २०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची "एक" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची "दोन" मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, क्रमांक १, धुळे यांचेकडेस सदर प्राथमिक अधिसूचनेवर एक हरकत प्राप्त झालेली असून त्यांना योग्य उत्तर देण्यात आले आहे. त्याबाबतचा अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम १५ अन्वये समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, धुळे यांना सादर केलेला आहे, सदर अहवाल विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादन करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक १, धुळे यांस पदनिर्देशित करीत आहे.

सदर जमिनींचे नकाशे व अन्य अभिलेख कार्यालयीन वेळेत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन सामान्य, धुळे यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

**अनुसूची - एक**

**जिल्हा धुळे, तालुका धुळे, मौजे कावठी**

| गट नंबर | | संपादन करावयाचे क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| | | लागवडीलायक क्षेत्र | पोट खराबा क्षेत्र | एकूण क्षेत्र |
| १ | | २ | ३ | ४ |
| | | हे. आर | हे. आर | हे. आर |
| ८१५ | .. | ० ३१ | ० ०० | ० ३१ |
| ५५१ | .. | ० १२ | ० ०२ | ० १४ |
| ५८६ | .. | ० ४२ | ० ०५ | ० ४७ |

**अनुसूची - एक** *— चालू*

| गट नंबर | | संपादन करावयाचे क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| | | लागवडीलायक क्षेत्र | पोट खराबा क्षेत्र | एकूण क्षेत्र |
| १ | | २ | ३ | ४ |
| | | हे. आर | हे. आर | हे. आर |
| ५२२ | .. | ० ३३ | ० ०६ | ० ३९ |
| ५२५ | .. | ० २० | ० ०० | ० २० |
| ५३५/२ | .. | ० १८ | ० ०४ | ० २२ |
| ५३६ | .. | ० २२ | ० ०२ | ० २४ |
| ४४५ | .. | ० १७ | ० ०० | ० १७ |
| ४४७ | .. | ० ०५ | ० ०० | ० ०५ |
| ५१२ | .. | ० २५ | ० ०० | ० २५ |
| **एकूण** | **..** | **२ २५** | **० १९** | **२ ४४** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

**प्रकल्पाचे प्रयोजन** : मौजे कावठी, तालुका धुळे, जिल्हा धुळे येथील डावा कालव्यावरील वितरिका क्रमांक ५.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती / कुटुंब राहत्या घरातून विस्थापित होणार नसल्याने पुनर्वसाहत क्षेत्राबाबतचा तपशील 'निरंक' आहे.

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती / कुटुंब राहत्या घरातून विस्थापित होणार नसल्याने पुनर्वसन व पुनर्वसाहत क्षेत्राबाबतचा तपशील 'निरंक' आहे.

**जलज शर्मा,**

जिल्हाधिकारी, धुळे.

धुळे, १९ जुलै २०२१.

## अपर जिल्हादंडाधिकारी यांजकडून

**वाचले :** (१) पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील पत्र क्रमांक जिविशा/प्रतिबंधात्मक आदेश-१२२६/२०२१, दिनांक २१ जून २०२१.

(२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)*.

### आदेश

क्रमांक ड/कक्ष-३/एमएजी-२/कावि-१५९७/२०२१.– उपोद्घातातील नमूद अनुक्रमांक (१) अन्वये पोलीस अधीक्षक, धुळे यांनी विनंती केली आहे की, धुळे जिल्ह्यातील आगामी काळात मराठा क्रांती मोर्चा, धनगर आरक्षण मोर्चा, मुस्लीम आरक्षण, ओ. बी. सी. संघटना अशा व इतर संघटना विविध प्रकारची आंदोलने करीत आहेत. तसेच दिनांक ३० जून २०२१ रोजी गोविंद महाराज जयंती असून तसेच वरीलप्रमाणे आंदोलन, मोर्चे, विविध कार्यक्रम होणार असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करण्यासाठी धुळे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव, दिनांक २८ जून २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून दिनांक १२ जुलै २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो मुंबई पोलीस कायदा, कलम ३७ *(१)* व *(३)* चे प्रतिबंधात्मक आदेश जारी होऊन प्रसिद्धी होणेस विनंती केलेली आहे.

धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकामी पोलिसांना मदत व्हावी म्हणून पोलीस अधीक्षक, धुळे यांनी सादर केलेला अहवाल व वरील परिस्थिती पाहता माझी खात्री झालेने संपूर्ण धुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणेसाठी पोलिसांना मदत व्हावी म्हणून मी, संजय गायकवाड, अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे मला उपोद्घातात नमूद अनुक्रमांक (२) अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून धुळे जिल्ह्यातील कोणत्याही इसमास खालील कृत्ये करण्यास याद्वारे मनाई करीत आहे.

(अ) सोटे, तलवारी, बंदुका, भाले, सुरे, लाठ्या किंवा शारीरिक दुखापती करण्यासाठी वापरात येतील अशी कोणतीही हत्यारे अथवा वस्तू बरोबर घेऊन फिरणे ;

(ब) अंग भाजून टाकणारा कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा द्रव्ये बरोबर घेऊन फिरणे ;

(क) दगड अगर अस्त्रे, सोडावयाची अगर फेकण्याची हत्यारे, साधने इत्यादी तयार करणे, जमा करणे आणि बरोबर नेणे ;

(ड) सार्वजनिक शांतता धोक्यात येईल अशी भाषणे करणे, हावभाव करणे अथवा सोंग आणणे ;

(इ) जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणणे, वाद्ये वाजविणे ;

(फ) कोणत्याही व्यक्तीची आकृती किंवा प्रतिमेचे प्रदर्शन करणे ;

(ग) सभा घेण्यास, मिरवणुका काढण्यास, पाच किंवा पाचापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई करीत आहे ;

(ह) संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या परवानगीशिवाय काढण्यात आलेले मोर्चे, रॅली, सभा ;

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* हा आदेश ज्यांना लाठी अगर तत्सम वस्तू घेतल्याशिवाय चालता येत नाही, अशा अपंग इसमांना लागू नाही. तसेच शासनाच्या सेवेतील ज्या व्यक्तींना आपल्या वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे, त्यांना लागू होणार नाहीत.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे व सदर कालावधीत सभा, मिरवणुका, मोर्चे, मिटिंग, कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या सहमतीने संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी द्यावी. अशी देण्यात आलेली परवानगी, लग्न समारंभ अगर प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले सदर निर्बंध लागू असतील.

सदरचा आदेश हा दिनांक २८ जून २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दिनांक १२ जुलै २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो संपूर्ण धुळे जिल्ह्यात अंमलात राहील.

सदरचा आदेश हा दिनांक २३ जून २०२१ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**संजय गायकवाड ,**
अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे.

धुळे, २३ जून २०२१.

**वाचले :** (१) पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील पत्र क्रमांक जिविशा/प्रतिबंधात्मक आदेश-१२२६/२०२१, दिनांक १२ जुलै २०२१.

(२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)*.

**आदेश**

क्रमांक ड/कक्ष-३/एमएजी-२/कावि-१७२२/२०२१.– उपोद्घातातील नमूद अनुक्रमांक (१) अन्वये पोलीस अधीक्षक, धुळे यांनी विनंती केली आहे की, धुळे जिल्ह्यातील आगामी काळात मराठा क्रांती मोर्चा, धनगर आरक्षण मोर्चा, मुस्लीम आरक्षण, ओ. बी. सी. संघटना अशा व इतर संघटना विविध प्रकारची आंदोलने करीत आहेत. तसेच दिनांक २० जुलै २०२१ रोजी आषाढी एकादशी तसेच दिनांक २१ जुलै २०२१ रोजी बकरी ईद साजरा होणार आहे व दिनांक २३ जुलै २०२१ रोजी गुरुपौर्णिमा असून वरीलप्रमाणे आंदोलन, मोर्चे, विविध कार्यक्रम होणार असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करण्यासाठी धुळे जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव, दिनांक १५ जुलै २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून दिनांक २९ जुलै २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो मुंबई पोलीस कायदा, कलम ३७ *(१)* व *(३)* चे प्रतिबंधात्मक आदेश जारी होऊन प्रसिद्धी होणेस विनंती केलेली आहे.

धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकामी पोलिसांना मदत व्हावी म्हणून पोलीस अधीक्षक, धुळे यांनी सादर केलेला अहवाल व वरील परिस्थिती पाहता माझी खात्री झालेने संपूर्ण धुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेसाठी व परिस्थितीवर नियंत्रण ठेवणेसाठी पोलिसांना मदत व्हावी म्हणून मी, संजय गायकवाड, अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे मला उपोद्घातात नमूद अनुक्रमांक (२) अन्वये मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून धुळे जिल्ह्यातील कोणत्याही इसमास खालील कृत्ये करण्यास याद्वारे मनाई करीत आहे.

(अ) सोटे, तलवारी, बंदुका, भाले, सुरे, लाठ्या किंवा शारीरिक दुखापती करण्यासाठी वापरात येतील अशी कोणतीही हत्यारे अथवा वस्तू बरोबर घेऊन फिरणे ;

(ब) अंग भाजून टाकणारा कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ किंवा द्रव्ये बरोबर घेऊन फिरणे ;

(क) दगड अगर अस्त्रे, सोडावयाची अगर फेकण्याची हत्यारे, साधने इत्यादी तयार करणे, जमा करणे आणि बरोबर नेणे ;

(ड) सार्वजनिक शांतता धोक्यात येईल अशी भाषणे करणे, हावभाव करणे अथवा सोंग आणणे ;

(इ) जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणणे, वाद्ये वाजविणे ;

(फ) कोणत्याही व्यक्तीची आकृती किंवा प्रतिमेचे प्रदर्शन करणे ;

(ग) सभा घेण्यास, मिरवणुका काढण्यास, पाच किंवा पाचापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई करीत आहे ;

(ह) संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या परवानगीशिवाय काढण्यात आलेले मोर्चे, रॅली, सभा ;

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* हा आदेश ज्यांना लाठी अगर तत्सम वस्तू घेतल्याशिवाय चालता येत नाही, अशा अपंग इसमांना लागू नाही. तसेच शासनाच्या सेवेतील ज्या व्यक्तींना आपल्या वरिष्ठांचे आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे, त्यांना लागू होणार नाहीत.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१)* व *(३)* नुसार संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय पाचपेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे व सदर कालावधीत सभा, मिरवणुका, मोर्चे, मिटिंग, कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांच्या सहमतीने संबंधित तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णय घेऊन परवानगी द्यावी. अशी देण्यात आलेली परवानगी लग्न समारंभ अगर प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले सदर निर्बंध लागू असतील.

सदरचा आदेश हा दिनांक १५ जुलै २०२१ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दिनांक २९ जुलै २०२१ रोजीचे २३.५५ वाजेपावेतो संपूर्ण धुळे जिल्ह्यात अंमलात राहील.

सदरचा आदेश हा दिनांक १२ जुलै २०२१ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**संजय गायकवाड,**
अपर जिल्हादंडाधिकारी, धुळे.

धुळे, १२ जुलै २०२१.

**नगराध्यक्ष यांजकडून**

**त्रिंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये**

**जाहीर सूचना**

क्रमांक त्रिंनप-२०७७/२०२१.— त्र्यंबकेश्वर शहराची विकास योजना (मूळ हद्द) (दुसरी सुधारित) शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१११८/२२६१/प्र. क्र. ३३० (अ)/२०१८/नवि-९, दिनांक २७ मे २०१९ अन्वये भागश: मंजूर झाली असून ती शासन पत्र क्रमांक टीपीएस-१११८/२२६१/प्र. क्र. ३३०/२०१८/नवि-९, दिनांक ९ डिसेंबर २०१९ पासून अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१११८/२२६१/प्र. क्र. ३३० (ब)/२०१८/नवि-९, दिनांक २७ मे २०१९ अन्वये शासनाकडे अंतिम मंजुरीस्तव सादर करण्यात आलेली आहे.

त्र्यंबकेश्वर शहराच्या उक्त विकास योजनेतील खालील प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) मधील तरतुदींनुसार फेरबदल करणेचा निर्णय नगरपरिषदेने मे. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३८६, दिनांक २१ मे २०२१ अन्वये घेतला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.—

**परिशिष्ट**

| **मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव** | **प्रस्तावित बदल** |
|---|---|
| १ | २ |
| त्रिंबक नगरपरिषदेची प्रारूप विकास योजना—त्र्यंबक [मूळ हद्द (दु.सु.)+वा.ह.] योजनेतील सर्व्हे नंबर ४१३ पै. सर्व्हे नंबर ४१९ पै. व सर्व्हे नंबर ४१८-अ पै. व सर्व्हे नंबर ३४३ पै. या क्षेत्रावर भागश: शेती क्षेत्र व आरक्षण क्रमांक ३१ पै. मध्ये दर्शविलेला आहे. | त्रिंबक नगरपरिषदेची प्रारूप विकास योजना—त्र्यंबक [मूळ हद्द (दु.सु.)+वा.ह.] योजनेतील सर्व्हे नंबर ४१३ पै. सर्व्हे नंबर ४१९ पै. व सर्व्हे नंबर ४१८-अ पै. व सर्व्हे नंबर ३४३ पै. या क्षेत्रावर भागश: शेती क्षेत्र व आरक्षण क्रमांक ३१ पै. मध्ये दर्शविलेलेनुसार आरक्षित क्षेत्र कायम ठेवून वरील नमूद क्षेत्रातून उदासिन आखाडा ते कालीका मंदिरापर्यंत ९.० मीटर रुंदी विकास योजना रस्ता व पूल प्रस्तावित करण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा त्रिंबक नगरपरिषदेच्या नोटिस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येत असून तो सर्व कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवलेला आहे.

ज्यांना नमूद सदरहू प्रस्तावित फेरबदल प्रस्तावाबाबत काही हरकती अथवा सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत, अध्यक्ष, त्रिंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर यांचे नावे लेखी सादर कराव्यात. उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मुदतीमध्ये प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचनांचा विचार शासनास मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी केला जाईल.

**पुरुषोत्तम बाळासाहेब लोहगांवकर,**
नगराध्यक्ष,
त्रिंबक नगरपरिषद, त्र्यंबक.

त्र्यंबक, २ ऑगस्ट २०२१.

---

**BY PRESIDENT**

**TRIMBAK MUNICIPAL COUNCIL, TRIMBAKESHWAR**

*Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 under Section 37 (1)*

**Public Notice**

No. TMC-2077/2021.– Trimbakeshwar City Development Plan (Basic Boundary) (Second Amendment) Government Approved under TPS-1118/2261/Q. No. 330 (a)/2018/Navi 9, dated 27th May 2019 it is a Government letter No. TPS-1118/2261/Q. No. 330/2018/Navi-9, has been implemented from 9th December 2019. Also Development Plan of the excluded area Government Notification

No. TPS-1118/2261/S.No. 330 (b)/2018/Navi-9, dated 27th May 2019 has been submitted to the Government for final approval.

The following proposals in the said Development Plan of Trimbakeshwar City were decided to be amended as per the provisions of Section 37 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 as per General Meeting Resolution No. 368 taken under dated 21st May 2021. The details as follows.–

**Annexure**

| **Proposals in approved Development Plan** | **Proposed Modification** |
|---|---|
| 1 | 2 |
| Trimbak Municipal Council's Draft Development Plan, Trimbak [Basic Boundary (Second Revision+ Extended Area ] Survey No. 413 P., Survey No. 419 P. And Survey No. 418/A and Survey No. 343/P Agricultural area and reservation No. 31 P shown in Development Plan. | Trimbak Municipal Council's Draft Development Plan, Trimbak [Basic Boundary (Second Revision+ Extended Area ] Survey No. 413 P., Survey No. 419 P. And Survey No. 418/A and Survey No. 343/P Agricultural area and reservation No. 31 P shown in Development Plan maintaining the reserved area as per above mentioned area Udasin Akhada to Kalika Temple Road of 9.0 mtrs. Width and Bridge over Stream is being proposed. |

The Development Plan showing the above proposed changes is being published on the notice board of Trimbak Municipal Council and is kept for the observation of the citizens during office hours on all working days.

Those who have any objections or suggestions regarding the proposed amendment should submit their suggestions in writing to the President, Trimbak Municipal Council, Trimbakeshwar within one month from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette. Objections / suggestions received within the prescribed time regarding the said proposed changes will be considered before submitting to the Government for Approval.

**PURUSHOTTAM BALASAHEB LOHGAVKAR,**

President,

Trimbak Municipal Council, Trimbak.

Trimbak, 2nd August 2021.

## सहायक निबंधक, सहकारी संस्था यांजकडून

### आदेश

क्रमांक सनिश्री/वि-२/श्रीरामसहगृनिसं/संस्था नोंदणी/जाहिरनामा/२८०५/सन २०२०.- सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर हे जाहीर करतात की, **श्रीराम सहकारी गाळेधारकांची गृहनिर्माण संस्था मर्यादित,** बेलवंडी बुद्रुक, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ चे नियम २४ अन्वये नोंदविण्यात आली असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १० *(१)* अन्वये या संस्थेचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था** असे करण्यात येत आहे.

सदर संस्थेचा नोंदणी क्रमांक एएनआर/एसजीए/एचएसजी/टीओ/४७८०/सन २०२०, दिनांक १ डिसेंबर २०२० असा आहे.

**रावसाहेब खेडकर,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, श्रीगोंदा,
जिल्हा अहमदनगर.

श्रीगोंदा, १ डिसेंबर २०२०.

---

**वाचावे.—**(१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जावक क्रमांक ल.ले./तपासणी/पतसंस्था/लिक्वीडेशन/२००५, दिनांक ४ मार्च २००५.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ मधील तरतुदी.

(३) या कार्यालयाचे जाक्रसनिशे/वि-२/प्रारूप मतदार यादी/ड वर्ग/सन २०१९, दिनांक २४ सप्टेंबर २०१९.

(४) या कार्यालयाचा अंतरिम आदेश जावक क्रमांक सनिशे/ज्ञानेश्वर उपसा/क १०२ व १०३/अंत. आदेश/सन २०१९, दिनांक २९ नोव्हेंबर २०१९.

### अंतिम आदेश

क्रमांक सनिशे/ज्ञानेश्वरउपसा/अं.आ./६७७-अ/सन २०२०.- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सुधारणा २०१३) चे कलम १०२ *(क)*, *(२)* व *(४)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अनिल व्ही. भांगरे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, शेवगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर असा आदेश देतो की, नोंदणी क्रमांक १०३५/२००७, दिनांक २९ मार्च २००७ ने नोंदविलेल्या **ज्ञानेश्वर उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्यादित,** कुरुडगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर या संस्थेला वाचावे क्रमांक ४ अन्वये दिलेले मध्यंतरीय आदेश कायम करीत असून सदर संस्थेचे कामकाज समाप्त करण्याबाबत अंतिम आदेश पारित करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १६ सप्टेंबर २०२० रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

शेवगाव, १६ सप्टेंबर २०२०.

---

**वाचावे.—**(१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जावक क्रमांक ल.ले./तपासणी/पतसंस्था/लिक्वीडेशन/२००५, दिनांक ४ मार्च २००५.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ मधील तरतुदी.

(३) या कार्यालयाचे जाक्रसनिशे/वि-२/प्रारूप मतदार यादी/ड वर्ग/सन २०१९, दिनांक २४ सप्टेंबर २०१९.

(४) या कार्यालयाचा अंतरिम आदेश जावक क्रमांक सनिशे/साईनाथ उपसा/क १०२ व १०३/अंत. आदेश/सन २०१९, दिनांक २९ नोव्हेंबर २०१९.

### अंतिम आदेश

क्रमांक सनिशे/साईनाथ उपसा/अं.आ./८५७/सन २०२०.- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सुधारणा २०१३) चे कलम १०२ *(क)*, *(२)* व *(४)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अनिल व्ही. भांगरे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, शेवगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर असा आदेश देतो की, नोंदणी क्रमांक १०३७/२००७, दिनांक २१ एप्रिल २००७ ने नोंदविलेल्या **साईनाथ उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्यादित,** राक्षी, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर या संस्थेला वाचावे क्रमांक ४ अन्वये दिलेले मध्यंतरीय आदेश कायम करीत असून सदर संस्थेचे कामकाज समाप्त करण्याबाबत अंतिम आदेश पारित करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

शेवगाव, २९ ऑक्टोबर २०२०.

---

**वाचावे.—**(१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जावक क्रमांक ल.ले./तपासणी/पतसंस्था/लिक्वीडेशन/२००५, दिनांक ४ मार्च २००५.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ मधील तरतुदी.

(३) या कार्यालयाचे जाक्रसनिशे/वि-२/प्रारूप मतदार यादी/ड वर्ग/सन २०१९, दिनांक २४ सप्टेंबर २०१९.

(४) या कार्यालयाचा अंतरिम आदेश जावक क्रमांक सनिशे/माऊली उपसा/क १०२ व १०३/अंत. आदेश/सन २०१९, दिनांक २९ नोव्हेंबर २०१९.

**अंतिम आदेश**

क्रमांक सनिशे/माऊली उपसा/अं.आ./८५८/सन २०२०.- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सुधारणा २०१३) चे कलम १०२ *(क), (२)* व *(४)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अनिल व्ही. भांगरे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, शेवगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर असा आदेश देतो की, नोंदणी क्रमांक १०३८/२००९, दिनांक ६ मे २००९ ने नोंदविलेल्या **माऊली उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्यादित,** शेवगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर या संस्थेला वाचावे क्रमांक ४ अन्वये दिलेले मध्यंतरीय आदेश कायम करीत असून सदर संस्थेचे कामकाज समाप्त करण्याबाबत अंतिम आदेश पारित करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

शेवगाव, २९ ऑक्टोबर २०२०.

---

**वाचावे.—**(१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जावक क्रमांक ल.ले./तपासणी/पतसंस्था/लिक्वीडेशन/२००५, दिनांक ४ मार्च २००५.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०२ व १०३ मधील तरतुदी.

(३) या कार्यालयाचे जाक्रसनिशे/वि-२/प्रारूप मतदार यादी/ड वर्ग/सन २०१९, दिनांक २४ सप्टेंबर २०१९.

(४) या कार्यालयाचा अंतरिम आदेश जावक क्रमांक सनिशे/साईकृपा उपसा/क १०२ व १०३/अंत. आदेश/सन २०१९, दिनांक २९ नोव्हेंबर २०१९.

**अंतिम आदेश**

क्रमांक सनिशे/साईकृपा उपसा/अं.आ./८५९/सन २०२०.- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सुधारणा २०१३) चे कलम १०२ *(क), (२)* व *(४)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अनिल व्ही. भांगरे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, शेवगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर असा आदेश देतो की, नोंदणी क्रमांक १०९७/२००५, दिनांक २९ मार्च २००७ ने नोंदविलेल्या **साईकृपा पाणीपुरवठा सहकारी संस्था मर्यादित,** कुरुडगाव, तालुका शेवगाव, जिल्हा अहमदनगर या संस्थेला वाचावे क्रमांक ४ अन्वये दिलेले मध्यंतरीय आदेश कायम करीत असून सदर संस्थेचे कामकाज समाप्त करण्याबाबत अंतिम आदेश पारीत करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी माझे सहीशिक्क्यानिशी दिला असे.

**अनिल व्ही. भांगरे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, शेवगाव,
जिल्हा अहमदनगर.

शेवगाव, २९ ऑक्टोबर २०२०.

---

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

### आदेश

क्रमांक बी-१/४०४६/२०२०.- श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांना दिनांक १४ डिसेंबर २०२० ते दिनांक १६ डिसेंबर २०२० पावेतो अशी ३ दिवसांची अर्जित रजा दिनांक १२ डिसेंबर २०२० (दुसरा शनिवार)व दिनांक १३ डिसेंबर २०२० (रविवार) रोजीचे सुट्टीस जोडून याद्वारे मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेनंतरपासून ते दिनांक १७ डिसेंबर २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. शैलेश रंगनाथ उगले यांना जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच श्री. शैलेश रंगनाथ उगले यांचे वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांचे उपरोक्त अनुपस्थितीचे कालावधीतील त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. अद्वैत दत्तात्रय क्षिरसागर, जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. शैलेश रंगनाथ उगले, जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, धुळे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

धुळे, ११ डिसेंबर २०२०.

---

### आदेश

क्रमांक बी-२/एमएच-२३१२/२०२३/२०२०.- श्री. एस. टी. मलिये, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांना दिनांक १४ डिसेंबर २०२० ते दिनांक १८ डिसेंबर २०२० पावेतो अशी ५ दिवसांची अर्जित रजा याद्वारे मंजूर करण्यात येत आहे. तसेच त्यांना दिनांक १२ डिसेंबर २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १९ डिसेंबर २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो मुख्यालय सोडण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. एस. टी. मलिये यांना सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे दिनांक १२ डिसेंबर २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेनंतर ते दिनांक १९ डिसेंबर २०२० रोजीचे कार्यालयीन वेळेपूर्वीपावेतो कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. एल. डी. गायकवाड, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नंदुरबार यांनी सांभाळावा.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. एस. टी. मलिये, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते, तर ते सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांचे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

**प्रमोद एस. तरारे,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नंदुरबार.

नंदुरबार, १० डिसेंबर २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.